नि.फौ.ख.क्र.४७/२०२४
सरकार वि. दिपक
नि.क्र.१६

साक्षीदार क्र **०४** ची सरतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :–कृणाल मोहणसिंग ठाकूर ब.न.१३५५,
वय ३८ वर्ष, व्यवसाय– पोलिस हवालदार.
राह. पोलिस स्टेशन बुट्टीबोरी.तह.जि.नागपूर.

**<u>सरतपासणी सरकारी वकील श्री. जे.एम.बोरकर यांच्या मार्फत शपथेवर सुरू.</u>**

१. सन २०२४ मध्ये मी बेला पो.स्टे. अंतर्गत ओ.पी.सिर्सी येथे कार्यरत होतो. गुन्हा रजिस्टर न.३४/२०२४ चा तपास मला दि.४/०२/२०२४ रोजी मिळाला होता. मला सदर डायरीमध्ये तोंडी खबर, फिर्याद, घटनास्थळ पंचनामा व जप्ती पंचनामा, समन्सपत्र, जप्त केलेला ट्रक १० ब्रास रेतिसह, चालक व वाहक इ. मिळाले होते. त्यानंतर दि.४/०२/२०२४ रोजी हजर असतांना पो. हवालदार हरिदास चाचरकर ब.न.२०७१ यांनी ओ.पी. सिर्सी यांना माहिती दिली की, ब्रम्हपुरी येथून रेती भरून सिर्सी मार्गे एक बारा चाकाचा टिप्पर वर्धा मार्गे जात आहे. त्यानंतर आम्ही सदर माहितीवरून सिर्सी येथे नाकाबंदी केली.

२. त्यानंतर आम्ही नाकाबंदी करून सापळा रचला असता त्यावेळी एक बारा चक्का टिप्पर येतांना दिसला असता आम्ही त्याला थांबविले, त्याची पाहणी केली असता त्यामध्ये रेती असल्याचे दिसुन आले. त्यानंतर आम्ही वाहक व चालक यांना रेतीच्या रॉयल्टीबाबत चौकशी केली असता त्यांच्याकडे कोणतीही रॉयल्टी नसल्याचे त्यांनी सांगितले. त्यानंतर पो. हवालदार हरिदास चाचरकर यांनी जप्ती पंचनामा कारवाई करून त्यांनी सदर रेतीसह टिप्पर जप्त केला. त्यानंतर त्यांनी फिर्याद दिली व गुन्हा नोंद झाला. त्यानंतर वरिष्ठांच्या आदेशावरून सदरचा तपास हा माझ्याकडे वर्ग करण्यात आला.

३. त्यानंतर चालक व वाहकाला अटक केली. त्यानंतर तहसिलदार यांना पत्रव्यवहार केला व आर.टी.ओ. यांनासुध्दा पत्रव्यवहार केला. आता मला तहसिलदार यांना पाठविलेले व आर.टी.ओ. यांना पाठविलेले पत्र दाखविण्यात आले त्यावर माझी सही आहे, त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे त्यास **नि.क्र.अनुक्रमे १७ व १८** देण्यात आला. त्यानंतर पंच व साक्षीदारांचे बयाण नोंदविले व तपासाअंती दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले. आता मला ६५ बी चे प्रमाणपत्र दाखविण्यात आले त्यावर माझी सही आहे, त्यातील

मजकूर खरा व बरोबर आहे त्यास **नि.क्र.१९** देण्यात आला. मी सा.क्र.३ प्रदिप शालीक गावंडे यांचे बयाणातील अधोरेखांकित भाग अ त्यांनी सांगितल्याप्रमाणे नोंदविला होता. आता मला त्यांच्या बयाणातील **अधोरेखांकित भाग अ** वाचुन दाखविण्यात आला तो मी त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविला होता तो खरा व बरोबर आहे त्यास **नि.क्र.२०** देण्यात आला. मी सा.क्र.२ प्रितम राजु रोकडे यांचे बयाणातील अधोरेखांकित भाग अ त्यांनी सांगितल्याप्रमाणे नोंदविला होता. आता त्यांच्या माझ्या बयाणातील **अधोरेखांकित भाग अ** वाचुन दाखविण्यात आला तो मी त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविला होता तो खरा व बरोबर आहे त्यास **नि.क्र.२१** देण्यात आला. आरोपीला पाहिल्यास मी ओळखतो. दोन्ही आरोपी न्यायालयात हजर आहेत ते तेच आहेत.

**सरतपास संपला.**

**आरोपीतर्फे ॲड. श्री. सलिम शेख यांच्यातर्फे उलटतपास सुरू.**

४. हे म्हणणे खरे नाही की, मी नि.क्र.१७ व १८ वरिल पत्र तहसिलदार व आर.टी.ओ. यांना पाठविले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सा.क्र.२ प्रितम व सा.क्र.३ प्रदिप यांचे बयाण त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविले नाही. मी आरोपींची सदर रेती कोठून आणली याबाबत चौकशी केली होती. सदर चौकशी केल्याबाबत मी दस्तऐवज अभिलेखावर दाखल केला आहे. आता मला अभिलेख दाखविण्यात आला त्यामध्ये आरोपीने सदर रेती कोठून आणली याबाबत दस्त अभिलेखावर नाही. साक्षीदार पुन्हा सांगतो की, सदर रेती ही चोरीची असल्यामुळे त्याबात दस्तऐवज आरोपींनी तपासादरम्यान दिला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीविरूध्द खोटी चौकशी करून खोटे दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, मी वरिष्ठांच्या सांगण्यावरून खोटा तपास केला व आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

वा.दा.ब.अ.सा. समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि २२.०१.२०२६

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड